29 JAN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या रोहनला रौप्यपदक

**अ. भा. आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धा**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या अ. भा. आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या रोहन रंडे याने ९७ किलो वजन गटात रौप्यपदक पटकाविले. यामुळे विद्यापीठाच्या खात्यात स्पर्धेतील दुसरे पदक आले आहे. पंजाब आणि हरियाणा येथील विद्यापीठांच्या कुस्तीपटूंनी चार विविध गटांमध्ये सुवर्णपदके जिंकली. आज स्पर्धेचा अखेरचा दिवस आहे.

राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सुरू असणाऱ्या स्पर्धेला कुस्तीशौकिनांची मोठी गर्दी होत आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पै. रोहन रंडे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज) याने अंतिम फेरीपर्यंत धडक मारली. मात्र, अमृतसरच्या गुरूनानक देव विद्यापीठाच्या सोनू याच्याकडून त्याला पराभव पत्करावा लागला. ६० किलो गटात शिवाजी विद्यापीठाच्या संतोष हिरुगडे याने अत्यंत चिवट खेळीचे प्रदर्शन करीत उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली. मात्र, त्याला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

आज ९७ किलो, ७७ किलो, ६७ किलो आणि ६० किलो अशा चार वजनी गटांचे कुस्ती सामने खेळविण्यात आले. यामध्ये अनुक्रमे गुरूनानक देव विद्यापीठ, अमृतसर (पंजाब), लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा (पंजाब), महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरियाणा) आणि कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र (हरियाणा) या चार विद्यापीठांनी सुवर्णपदक जिंकण्याची कामगिरी केली.



कोल्हापूर : कुस्ती स्पर्धेच्या ९७ किलो वजन गटात रौप्यपदक मिळविणारा शिवाजी विद्यापीठाचा कुस्तीपटू रोहन रंडे, सुवर्णपदक मिळविणारा सोनू, कांस्य मिळविणारे रविंदर व रॉबिन सिंग.



लोकमत

# विद्यापीठाच्या रोहन रंडेला रौप्य

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या रोहन रंडे याने ९७ किलो वजनी गटात शनिवारी रौप्य पदकाची कमाई केली. विद्यापीठाचे या स्पर्धेतील हे दुसरे पदक आहे. स्पर्धेत पंजाब आणि हरयाणा येथील विद्यापीठांच्या कुस्तीगीरांनी विविध गटांत सुवर्ण पदकांची कमाई केली.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहात सुरू असलेल्या या स्पर्धेत पंजाब-हरयाणाच्या कुस्तीगीरांना दुसऱ्या दिवशीही वर्चस्व राखले. शिवाजी विद्यापीठाच्या रोहन रंडे याने ९७ किलो वजनी गटात त्याने अंतिम फेरीपर्यंत धडक मारली. मात्र, अमृतसरच्या गुरुनानकदेव विद्यापीठाच्या सोनू याच्याकडून पराभव पत्करावा लागला. रोहनला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.



९७ किलो गटातील विजेते रोहन रंडे (रौप्य), सोनू(सुवर्ण), रविंदर व रॉबीनसिंग. (कांस्य).

रोहन हा गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे.

दिवसभरात ९७ किलो, ७७ किलो, ६७ किलो आणि ६० किलो अशा चार वजनी गटांचे कुस्ती सामने खेळविण्यात आले. यात अनुक्रमे गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर (पंजाब), लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा (पंजाब), महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरयाणा) आणि कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र (हरयाणा) या चार विद्यापीठांनी सुवर्ण पदक जिंकण्याची कामगिरी केली.

निकाल असा (अनुक्रमे सुवर्ण, रौप्य, कांस्य) ६० किलो: हर्ष राणा (कुरुक्षेत्र विद्यापीठ), हरदीप सिंग (पंजाब विद्यापीठ), अजीत कुमार (महात्मा गांधी काशी विद्यापीठ, वाराणसी), दिनेश कुमार (चौधरी रणबीरसिंह विद्यापीठ, जिंद, हरयाणा). ६७ किलो: अनिल (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), सौरभ (कलिंगा विद्यापीठ, छत्तीसगढ), अंकित (देश भगत विद्यापीठ, मंडी), अमित कुमार (पंडित दीनदयाळ उपाध्याय शेखावती विद्यापीठ, शिखर). ९७ किलो: सोनू (गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर), रोहन रंडे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), रविंदर (तंत्रज्ञान विद्यापीठ, जयपूर), रॉबिन सिंग (रोहतक) यांचा समावेश आहे.

29 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दुसऱ्या दिवशीही पंजाब, हरियानाच्या विद्यापीठांना सुवर्णपदके

# शिवाजी विद्यापीठाच्या रोहनला रौप्य




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेत ९७ किलो वजन गटात सोनू याने सुवर्णपदक, रोहन रंडे याने रौप्यपदक, रविंदर व रॉबिनसिंग यांनी कांस्यपदक मिळविले.

▸सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेत आज दुसऱ्या दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या रोहन रंडे या कुस्तीपटूने ९७ किलो वजन गटात रौप्यपदक जिंकले. विद्यापीठाचे या स्पर्धेतील हे दुसरे पदक आहे. पंजाब आणि हरियाना येथील विद्यापीठांच्या कुस्तीपटूंनी चार विविध गटांमध्ये सुवर्णपदके जिंकली. उद्या (ता. २९) स्पर्धेचा अखेरचा दिवस आहे. स्पर्धेत देशभरातील १३१ विद्यापीठांचे ८९४ कुस्तीपटू सहभागी झाले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात २२ जानेवारीपासून राष्ट्रीय कुस्त्यांचा थरार पाहायला मिळतो आहे. ग्रीको-रोमन स्पर्धेमुळे तर सामने अधिकच रंगतदार बनले आहेत. अत्यंत चपळतेने व चुरशीने होत असलेले हे सामने पाहण्यासाठी कुस्तीशौकिनांची गर्दी आहे. स्पर्धेमध्ये पंजाब-हरियाणाच्या कुस्तीपटूंचे निर्विवाद वर्चस्व असले तरी यजमान शिवाजी विद्यापीठाच्या कामगिरीकडेही सर्वांचेच लक्ष लागून आहे. विद्यापीठाचे स्पर्धेत सहभागी दहा कुस्तीपटू बाद फेरीच्या सामन्यांमध्ये अत्यंत चुरशीने प्रतिस्पर्ध्यांना झुंजवित आहेत. पदकाच्या दृष्टीने कालचा दिवस सुना गेला असला, तरी आज रोहन रंडे याने ही उणीव भरून काढली. ९७ किलो वजनी गटात त्याने अंतिम फेरीपर्यंत धडक मारली, मात्र अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाच्या सोनू याच्याकडून त्याला पराभव पत्करावा लागला. रोहनला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. रोहन हा गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. या स्पर्धेत आज ९७, ७७, ६७ आणि ६० किलो अशा चार वजन गटांचे कुस्ती सामने खेळविण्यात आले.

यामध्ये अनुक्रमे गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर (पंजाब), लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा (पंजाब), महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरियाना) आणि कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र (हरियाना) या चार विद्यापीठांनी सुवर्णपदक जिंकण्याची कामगिरी केली.

**अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा**

**संतोष हिरुगडे उपांत्यपूर्व फेरीत**

■ ६० किलो वजन गटात शिवाजी विद्यापीठाच्या संतोष हिरुगडे याने अत्यंत चिवट खेळीचे प्रदर्शन करीत उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली. मात्र, त्याला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले. तो अर्जुननगरच्या देवचंद महाविद्यालयाचा कुस्तीपटू आहे.

**विविध वजन गटांतील विजेते**

या स्पर्धेत आज विविध वजनी गटांतील विजेत्यांमध्ये (अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके विजेते) ६० किलो : हर्ष राणा (कुरुक्षेत्र), हरदीप सिंग (चंडीगड), अजित कुमार (वाराणसी), दिनेश कुमार (हरियाना). ६७ किलो: अनिल (रोहतक), सौरभ (छत्तीसगढ), अंकित (मंडी), अमित कुमार (शिखर). ७७ किलो : करण (फगवाडा), रोहित बुरा (रोहतक), अभिमन्यू (चंडीगड), सागर (कुरुक्षेत्र). ९७ किलो : सोनू (पंजाब), रविंदर (जयपूर), रॉबिन सिंग (रोहतक).

29 JAN 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यवस्थापन परिषदेसाठी ३८ अर्ज, उद्या अंतिम मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेतून आठ उमेदवार व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून निवडून देण्यासाठी निवडणूक अधिसूचना दि. १८ जानेवारी रोजी प्रसिद्ध केली होती. त्यासाठी अर्ज दाखल करण्यास शनिवारी सुरुवात झाली असून, विविध गटांतून ३८ अर्ज दाखल करण्यात आले.

यामध्ये प्राचार्य, शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर आणि व्यवस्थापन प्रतिनिधी यांच्यामधून प्रत्येकी दोन सदस्य निवडून द्यायचे होते.

दाखल अर्जांची छाननी दि. ३० जानेवारी रोजी होणार आहे, तर दि. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्यासाठीची मुदत आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची निवडणूक अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** अधिसभेतून आठ उमेदवार व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून निवडून देण्यासाठी निवडणूक अधिसूचना १८ जानेवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. प्राचार्य, शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर आणि व्यवस्थापन प्रतिनिधी यांच्यामधून प्रत्येकी दोन सदस्य निवडून द्यावयाचे होते. यातील प्राचार्य पदासाठी खुल्या जागेसाठी चार नामांकने, इतर मागासवर्गीय जागेसाठी दोन नामांकने प्राप्त झाली आहेत. शिक्षकांतून निवडून द्यावयाच्या खुल्या प्रवर्गाच्या जागेसाठी १५, तर अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या जागेसाठी तीन नामांकने प्राप्त झाली आहेत. नोंदणीकृत पदवीधरमधून निवडून द्यावयाच्या खुल्या जागेसाठी २६, तर डीटीएनटी प्रवर्गाच्या जागेसाठी तीन नामांकने प्राप्त झाली आहेत. व्यवस्थापन परिषदेमधील खुल्या जागेसाठी तीन, तर अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेसाठी एकही नामांकन प्राप्त झालेले नाही. उमेदवारी अर्जाची छाननी ३० जानेवारी रोजी होणार आहे. १ फेब्रुवारी रोजी पाच वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्यासाठीची मुदत आहे.



सकाळ

# अधिसभेतून व्यवस्थापन परिषद सदस्यपदासाठी ५६ नामांकने

## खुल्या जागेत सर्वाधिक संख्या; उद्या अर्जांची छाननी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेतून (सिनेट) आठ उमेदवार व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून निवडून देण्यासाठी निवडणूक अधिसूचना १८ जानेवारीला प्रसिद्ध करण्यात आली होती. अधिसभेतून व्यवस्थापन परिषद सदस्यपदासाठी ५६ नामांकने प्राप्त झाली आहेत. उमेदवारी अर्जांची छाननी सोमवारी (ता. ३०) होईल. बुधवारी (ता. १) सायंकाळी पाचपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे.

प्राचार्य, शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर आणि व्यवस्थापन प्रतिनिधी यांच्यातून प्रत्येकी दोन सदस्य निवडून द्यावयाचे होते. त्यातील प्राचार्यपदासाठी खुल्या जागेकरिता एकूण चार नामांकने, इतर मागासवर्गीय जागेसाठी दोन नामांकने प्राप्त झाली आहेत. शिक्षकांतून निवडून द्यावयाच्या खुल्या प्रवर्गाच्या जागेसाठी १५, तर अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या जागेसाठी तीन नामांकने प्राप्त झाली आहेत.

नोंदणीकृत पदवीधरमधून निवडून द्यावयाच्या खुल्या जागेसाठी २६, तर डीटीएनटी प्रवर्गाच्या जागेसाठी तीन नामांकने प्राप्त झालेली आहेत. व्यवस्थापन परिषदेतील खुल्या जागेसाठी तीन, तर अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेसाठी एकही नामांकन प्राप्त झालेले नाही.

लोकमत

# व्यवस्थापन परिषदेसाठी ५६ अर्ज दाखल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांमधून निवडून देण्यात येणाऱ्या आठ व्यवस्थापन परिषद सदस्यांसाठी विविध जागांसाठी सुमारे ५६ अर्ज दाखल झाले आहेत. अर्जाची छाननी ३० जानेवारीला होणार आहे, तर १ फेब्रुवारीला पाच वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्यासाठीची मुदत आहे. व्यवस्थापन परिषदेमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेसाठी एकही नामांकन प्राप्त झालेले नाही. शनिवारी प्राचार्य पदासाठी खुल्या जागेसाठी एकूण चार नामांकने इतर मागासवर्गीय जागेसाठी दोन नामांकने प्राप्त झाली. शिक्षकातून निवडून द्यावयाच्या खुल्या प्रवर्गाच्या जागेसाठी पंधरा, तर अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या जागेसाठी तीन नामांकने प्राप्त झाली आहेत. अर्जाची छाननी ३० जानेवारीला होणार आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात लेखक संवाद कार्यक्रम

कोल्हापूर : लेखनाच्या निर्मिती प्रक्रियेसंबंधी भूमिका मांडत असताना लेखक होण्यासाठी काल्पनिक व मानसिक विश्व निर्माण होणे खूप महत्त्वाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन प्रख्यात लेखक किरण गुरव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२३ निमित्त लेखक संवाद मालिकेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मराठी विभागाचे प्रमुख प्रा. नंदकुमार मोरे व प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी गुरव यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी प्रा. डॉ. अवनिश पाटील प्रा. अविनाश भोरे, प्रा. नीलम पाटील, प्रा. सुवर्णा जाधव, प्रा. वैशाली औताडे, प्रा. दत्ता पाटील, प्रा. गोमटेश्वर पाटील व प्रा. शरद गायकवाड, प्रा. गुंडोपंत पाटील, भिलवडी येथील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठाच्या 'सैफ' सेंटरला कोटीचा निधी मंजूर

## सोनकवडे : अत्याधुनिक उपकरणे खरेदी करणार

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या 'सोफिस्टिकेटेड एनालिटिकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटी' (सैफ) सेंटरला केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून अत्याधुनिक शास्त्रीय उपकरण खरेदीसाठी एक कोटीचा निधी मंजूर झाला आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी दिली.

विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने सन २०१३ मध्ये विद्यापीठाला 'सैफ' केंद्र मंजूर केले. त्यावेळी विद्यापीठास ५ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. चार उपकरणेही मंजूर झाली. सध्या हे केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रासाठी विश्लेषणाचे काम कार्यक्षमतेने करीत आहे. गेल्या डिसेंबरमध्ये नवी दिल्ली येथे 'सैफ' केंद्राच्या समितीसमोर विद्यापीठातर्फे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. परिणामी डी.एस.टी.ने विद्यापीठाच्या सैफ केंद्राला अत्याधुनिक उपकरणाच्या खरेदीसाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, अशी माहिती डॉ. सोनकवडे यांनी दिली.

लोकमत

# 'क्लस्टर' : उच्च शिक्षणाचे 'नॉलेज हब'

चार महाविद्यालयांमधील संसाधन, संशोधन, साधन, व्यक्ती, वाचनालय, क्लासरुम अशा सर्व बाबींची आदान-प्रदान करणारी योजना म्हणजे समूह (क्लस्टर) विद्यापीठ होय. ज्याला बहुविद्याशाखीय क्लस्टर्स किंवा नॉलेज हब म्हणून संबोधले जाणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात आंतरविद्याशाखीय, कौशल्याभिमुख अभ्यासक्रम, उद्योजकांचा सहभाग, क्लस्टर महाविद्यालये, मातृभाषेतून शिक्षण, सीबीसीएस पद्धती, एबीसी आदी २१ मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत केले आहे. हे धोरण राबविण्याची मोठी जबाबदारी विद्यापीठांवर आहे. या अनुषंगाने विविध पातळीवर विद्यापीठांमधून कामही सुरू झाले आहे.

भारतात बहुतांश उच्च शिक्षण संस्था या एकल विद्याशाखीय स्वरुपाच्या शिक्षण देणाऱ्या असल्याने या शिक्षण संस्थांमध्ये विविध विषय अध्ययन-अध्यापनाची कमतरता भासते. या कारणास्तव एकल विद्याशाखीय शैक्षणिक संस्थाच्या ऐवजी बहुविद्याशाखीय उच्च शैक्षणिक संस्था स्थापन करणे किंवा अनेक उच्च शैक्षणिक संस्थाचा समूह (क्लस्टर) बनवून नाविन्यपूर्ण शिक्षण आणि संशोधनाच्या नव्या संधी उपलब्ध करुन भारतीय उच्च शिक्षण प्रणालीस अधिक उंचीवर नेण्याचे उद्दीष्ट राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये प्रामुख्याने ठेवण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सप्टेंबर २०२२ मध्ये याबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केलेल्या असून या योजनेची संकल्पना विस्ताराने मांडलेली आहे. अशा एकल विद्याशाखीय संस्था आणि बहुविद्याशाखीय संस्थामधील वेगवेगळे शैक्षणिक विभाग एकत्र येऊन परस्पर समन्वयाने उदयोन्मुख आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रशिक्षणाचा नाविन्यपूर्ण आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम उपलब्ध करु शकतात.

क्लस्टर योजना राज्यामध्ये यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टीकोनातून औरंगाबाद, नागपूर व अमरावती या विभागीय स्तरावर समिती गठीत केली आहे. यामध्ये डॉ. विजय जोशी (वरिष्ठ सल्लागार, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा), डॉ. संजीव सोनावणे, (प्र-कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे) पुणे विभागीय सहसंघालक, तंत्र शिक्षण, संबंधित विभाग सदस्य ४, शासकीय संस्था / प्राचार्य / अधिष्ठाता, सहसंचालक आदींचा समावेश आहे. ही समिती समूह महाविद्यालये, विद्यापीठे व शासन यामध्ये समन्वय साधण्याचे काम करेल. क्लस्टरसाठी शिफारस करणे, पायाभुत सुविधांबाबत मार्गदर्शक तत्वे तयार करणे, अभ्यासक्रमाची पुर्नरचना करणे इत्यादी कार्य करेल.

- डॉ. प्रकाश मुंज

(लेखक 'लोकमत'च्या कोल्हापूर आवृत्तीत वरिष्ठ उपसंपादक आहेत.)

## शिवाजी विद्यापीठातच 'क्लस्टर'चा पहला प्रयोग

क्लस्टर योजनेचा राज्यात सर्वप्रथम प्रयोग शिवाजी विद्यापीठांत आणि त्यानंतर पुणे विद्यापीठाने काही प्रकल्पांच्या संदर्भात केले होते. शिवाजी विद्यापीठाची 'अग्रणी महाविद्यालयीन योजना' याचाच द्योतक आहे. देशातील पहिले समूह विद्यापीठ होण्याचा सन्मान हिमाचल प्रदेशातील मंडी कॉलेजला मिळाला आहे.



## राज्यातील पहिले 'डॉ. होमी भाभा' समूह विद्यापीठ

मुंबईतील शासकीय विज्ञान संस्था (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स), सिडनहॅम कॉलेज, एलफिन्स्टन कॉलेज व शासकीय अध्यापक महाविद्यालय (बीएड कॉलेज) चार महाविद्यालयांना एकत्रित करुन डॉ. होमी भाभा विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. हे राज्यातील पहिले आणि देशातील तिसरे समूह विद्यापीठ ठरले आहे. कुलगुरु पदाचा धुरा शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. रजनीश कामत संभाळत आहेत.

## 'क्लस्टर'चा उद्देश

- उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावणे
- विद्यापीठांवरील ताण कमी करणे
- कौशल्य विकासावर भर, गुणवत्ता वाढीस मदत
- रोजगार निर्मितीभिमुख अभ्यासक्रम राबविणे
- आवश्यक भौतिक सुविधा पुरविणे
- मानव संसाधन व अन्य साधन सुविधांचा अधिकाधिक वापर
- विद्यार्थ्यांना आवडीनुसार अभ्यासक्रमांची निवड

तरूण भारत

# व्यवस्थापन परिषद उमेदवारी अर्जांची छाननी सोमवारी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची निवडणूक-८ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यासाठी प्राचार्य, शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर आणि व्यवस्थापन प्रतिनिधीमधून प्रत्येकी २ सदस्य निवडून द्यावयाचे आहेत. यापैकी प्राचार्य पदासाठी खुल्या प्रवर्ग जागेसाठी ४ अर्ज, इतर मागासवर्गीय जागेसाठी २ अर्ज आले आहेत. शिक्षकामधून खुला प्रवर्ग जागेसाठी १५, अनुसुचित जातीसाठी राखीव जागेसाठी ३ अर्ज आले आहेत. नोंदणीकृत पदवीधर खुला प्रवर्ग जागेसाठी २८ तर डीटीएनटी प्रवर्ग जागेसाठी ३ अर्ज आले आहेत. व्यवस्थापन परिषदेमधील खुला प्रवर्ग जागेसाठी ३, अनुसुचित जमाती राखीव जागेसाठी एकही अर्ज आलेला नाही. प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी ३० जानेवारी रोजी होणार आहे. तर १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज माघारीसाठी वेळ आहे. तरी याची दखल संबंधीतांनी घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

29 JAN 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्राला एक कोटी निधी मंजूर


■ डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या प्रयत्नाला यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या 'सोफिस्टीकेटेड एनालिटिकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटी' अर्थात 'सैफ' सेंटरला भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून अत्याधुनिक शास्त्रीय उपकरण खरेदीसाठी एक कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. केंद्राचे संचालक डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी केलेल्या प्रयत्नाला यश आल्याची माहिती डॉ. सोनकवडे यांनी दिली.

डॉ. सोनकवडे म्हणाले, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (डी.एस.टी.) सन २०१३ मध्ये शिवाजी विद्यापीठाला 'सैफ' केंद्र मंजूर केले. त्यावेळी विद्यापीठास ५ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. चार उपकरणेही मंजूर झाली. सध्या हे केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रासाठी विश्लेषणाचे काम कार्यक्षमतेने करीत आहे. गेल्या डिसेंबरमध्ये नवी दिल्ली येथे 'सैफ' केंद्राच्या समितीसमोर विद्यापीठातर्फे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. परिणामी डी. एस. टी.ने विद्यापीठाच्या सैफ केंद्राला अत्याधुनिक उपकरणाच्या खरेदीसाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. विद्यापीठाला सैफ केंद्राच्या मंजुरीनंतर प्रथमच इतका मोठा निधी मंजूर झाला आहे. सन २०१३-१४ मध्ये कोट्टायम, शिवपूर, पाटणा, धारवाड आणि कोल्हापूर अशी देशभरात चार सैफ केंद्रे मंजूर झाली होती. शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्र त्याची सेवा व विश्लेषणाची विश्वासार्हता यामुळे खूपच लोकप्रिय बनले. वापरकर्ते विविध नमुन्यांच्या विश्लेषणासाठी या केंद्राला पसंती देतात. त्याचप्रमाणे विविध वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांनादेखील या केंद्राचे आकर्षण वाटते.

केंद्र अव्याहतपणे सुरू ठेवण्यासाठी आहे त्यासाठी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे मार्गदर्शन लाभले. डॉ. सोनकवडे यांनी केलेल्या प्रयत्नामुळे हा निधी मिळाल्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांनी डॉ. सोनकवडे यांचे अभिनंदन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्रातील उपकरणे.

पुण्यनगरी

# विद्यापीठाला 'सैफ'साठी कोटीचा निधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सोफिस्टिकेटेड एनालिटिकल इन्स्टूमेंट फॅसिलिटी अर्थात 'सैफ' सेंटरला भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून अत्याधुनिक शास्त्रीय उपकरण खरेदीसाठी एक कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. केंद्राचे संचालक डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी ही माहिती दिली.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (डी.एस.टी.) २०१३ मध्ये शिवाजी विद्यापीठाला 'सैफ' केंद्र मंजूर केले. त्यावेळी ५ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. सध्या हे केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे. डिसेंबरमध्ये नवी दिल्ली येथे 'सैफ' केंद्राच्या समितीसमोर विद्यापीठातर्फे प्रभावी सादरीकरण केले होते. परिणामी, डीएसटीने एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

प्रथमच इतका मोठा निधी मंजूर झाला आहे. हे केंद्र सुरू ठेवण्यासाठी, क्षमतावर्धनासाठी मार्गदर्शन करणारे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे डॉ. सोनकवडे यांनी आभार मानले.